शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
AH$ Oc 2018
AH$ H$. 36
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

df : 47 AH$ : 46 H$mëhmna Vm. 14 AmJñQ> 2018 qH$_V 2 én` Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

## आदरांजली



नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य आणि माजी अध्यक्ष आदरणीय श्री. माधवराव चिंतामण भिडे, मुंबई यांचे नुकतेच निधन झाले. भिडे प्रतिष्ठानचा एक निर्माता, ज्येष्ठ मार्गदर्शक, उद्योजक, अभियंता असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही ह्याबद्दल आपल्या सर्वांनाच खेद वाटतो. भिडे प्रतिष्ठानसाठी त्यांनी वेळोवेळी केलेली सामाजिक बांधिलकी शेवटच्या श्वासापर्यंत जपली. भिडे प्रतिष्ठान ही संस्था भिड्यांसाठी आणि भिड्यांनी सुरू केलेल्या ह्या संस्थेचा आता वृक्ष तयार झाला. त्यामध्ये त्यांचे योगदान बहुमोल आहे. २००८ मध्ये ५६ वर्षांनी भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्यासाठी त्यांचा सहभाग प्रामुख्याने जाणवला.

१९५३ साली पुणे विद्यापीठातून अभियंता ही पदवी दुसऱ्या क्रमांकाने प्राप्त केली. रेल्वेमध्ये नोकरी पत्करून अनेक रेल्वे प्रकल्प निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अनेक मोठेमोठे ब्रीज, दिवा-वसई ही ४२ कि.मीटरची नवीन रेल्वेलाईन अशा अनेक प्रकल्पांवर त्यांनी काम केले होते. म्हणून ब्रीजवाले भिडे अशीच त्यांची ओळख होती. त्यांनतर एलएलबी पदवी मिळवली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ब्रीज इंजिनिअर ही संस्था त्यांनी स्थापन केली. ह्या संस्थेचे आजमितीला हजारो सदस्य असून देशात व परदेशात अनेक शाखाही आहेत. ह्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय परिषदा घडवून आणल्या. आंध्र प्रदेश सरकारने त्यांना नॅशनल ब्रीज संशोधन केंद्रासाठी मध्यवर्ती जागा उपलब्ध करून दिली.

मुंबईमध्ये चर्चगेटला २४ वर्षे रेल्वे निवासात राहत असताना अनेक भारतीय भाषिकांचा संबंध आला. त्यातून मराठी समाजातील उद्योग व्यावसायिकांनी एकत्र येऊन आपली प्रगती साधावी म्हणून १९८९ पासून 'सॅटर्डे क्लब' (Saturday Club) ह्या संस्थेची स्थापना केली. ह्या संस्थेचे देशात व परदेशात अनेक सदस्य असून आपण मराठी माणसाने नोकरी करण्यापेक्षा उद्योग व्यवसाय करावा ह्या दृष्टीने उद्योजकांचे मेळावे, अनेक बैठका, उद्योग सुरू करण्यासाठी काही कल्पना, मार्गदर्शन ह्यासाठी अनेक परिषदासुद्धा भरवल्या. 'एकमेका साहाय्य करू अवघे होऊ श्रीमंत' ह्या त्यांच्या बोधवाक्याने अनेक गरजू उद्योजकांनी आपला श्रीगणेशा करून नवीन उद्योगाची प्रेरणा आत्मसात केली. त्या निमित्ताने मद्रास, बेंगलोर, आंध्र प्रदेश, नागपूर ह्या ठिकाणांच्या व्यावसायिकांना एकत्र आणले. त्याच सुमारास 'भिडे असोसिएटस्' ह्या संस्थेची स्थापना केली. ह्या संस्थेच्या माध्यमातून अनेक बँका आणि संस्थांना तांत्रिक, वित्तीय आणि व्यवस्थापकीय सेवा देत असतात. तिच्या देशात १६ शाखा असून शाखाप्रमुख म्हणून सर्व मराठी भाषिक आहेत ही अभिमानाची बाब आहे.

रेल्वेमध्ये उच्च पदावर नोकरी करीत असताना १०० कलाकारांचा सांस्कृतिक कोटा निर्माण करून अनेकांना रेल्वेत नोकऱ्या दिल्या. मध्य रेल ललित कला मंडळ आणि रेल्वे कल्चरल ॲकॅडमी (Central Rail Lalit Kala Mandal and Railway Cultural Acadamy) च्या माध्यमातून बोरीबंदर जवळ रेल्वेच्या ऑफिस इमारतीत ५०० आसनांची क्षमता असलेल्या वातानुकुलीत सभागृहाची निर्मिती केली. एवढेच नाही तर, त्यांनी १०० चे वर कविताही लिहिलेल्या आहेत. सामाजिक क्षेत्रात सुद्धा अग्रेसर होते. डोंबिवलीच्या गणेश मंदिराचे नूतनीकरण करून, वाचनकक्ष, ध्यानमंदिर अशा अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या. महिलाश्रम, वनवासी कल्याण, मूकबधीर विद्यालय अशा अनेक संस्थांना उदार मनाने देणग्या दिल्या. अनेक चांगल्या कार्यांमध्ये तन, मन, धन झोकून काम करावयाचे ही त्यांची वृत्ती होती.

२००४ साली त्यांना ७५ वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने त्यांनी त्या दिवशी एक कार्यक्रम आयोजित केला होता आणि नेमकी त्याच दिवशी सायंकाळी ठाणे येथे भिडे प्रतिष्ठानची वार्षिक सभा ठाणे येथे आयोजित केली होती. परंतु माधवराव मात्र त्या दिवशी आपला कार्यक्रम आटोपून ह्या सभेला एक विश्वस्त म्हणून जातीने उपस्थित होते हे विशेष होय. १९८९ नंतर त्यांनी निवृत्ती घेतल्यानंतर मुंबईत आपले एक ऑफिस सुरू केले. त्या वेळेस त्यांच्याकडे ऑफिसची सफाई किंवा इतर कामांसाठी नोकर ठेवलेला नव्हता. परंतु ऑफिस सुरू करण्याअगोदर अर्धा तास येऊन स्वतः आपल्या स्वतःच्या ऑफिसची झाडलोट स्वतः करीत असत. ७५ व्या वाढदिवशी त्यांनी 'सेतु माधव' ह्या नावाचे आत्मचरित्र प्रकाशित केले.

'आम्ही भिडे' अंक सुरू केल्यानंतर विनामूल्य वितरण करायचे हे नक्की होते. परंतु त्याकरिता आर्थिक बळ म्हणून जाहिरात हे एकच माध्यम होते. त्यानुसार दरवर्षी दहा हजार रुपये जाहिरातीसाठी त्यांनी देऊ केले. भिडे प्रतिष्ठानमध्ये 'Venture Capital Fund' ही कल्पना त्यांनी मांडली. ढोबळ मानाने सांगायचे झाले तर ह्या संकल्पनेनुसार उद्योगासाठी भिडे मंडळींना आपण ह्या निधीमधून कर्ज द्यायचे आणि नाममात्र व्याज घेऊन त्यांना आर्थिक मदत करायची प्रत्यक्षात ही संकल्पना उत्तम होती. परंतु पुरेसे मनुष्यबळ, आर्थिक बळ ह्यांची कमतरता असल्यामुळे ही वास्तवात आणली नाही असो. त्यांचा महिमा आणि गुण सांगावे तेवढे थोडेच आहेत. सरतेशेवटी कोठेतरी थांबायचे हा निसर्गनियमच आहे. सॅटर्डे क्लब, भिडे असोसिएटस्, भिडे प्रतिष्ठान ह्या माध्यमांतून त्यांची उद्योगविश्वाशी आणि सामाजिक संस्थांशी जवळीक हे आपल्याला बरेच काही शिकवून जाते.

आम्ही सर्व भिडे कुटुंबीय आणि नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे ज्येष्ठ कार्यकर्ते त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वर त्यांना चिरशांती देवो हीच प्रार्थना.

-नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, कार्यकारिणी

# एका कर्तृत्वाची अखेर : माधव चिंतामण भिडे

परवा दि. ६ जुलैला सकाळपासून जोरदार पाऊस पडत होता. मुंबईत रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. सावधानतेचा इशारा म्हणून आवश्यकता असेल तरच प्रवास करा. अशा वातावरणात मोबाइलवर अचानक मेसेज धडकला, काय होता मेसेज ?

माहिम येथे राहणारे माधव चिंतामण भिडे यांचे अल्पशा आजाराने निधन. ते हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते ही गोष्ट कळली आणि त्यांच्या बरोबरचा काही वर्षांपुरता सहवास आठवला. आयुष्यात काही काही माणसे अचानक भेटतात. खरे म्हणजे त्यांचे कर्तृत्व, त्यांचे विचार बघितले की आपली भेट ही नियतीने घडविलेला योगायोगच म्हणावा लागेल.

माधवराव भिडे, प्रतिष्ठानचे सुरुवातीपासूनचे विश्वस्त होते. याचे कारण म्हणजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष दूरदर्शनवरील प्रसिद्ध वृत्तनिवेदक श्री. प्रदीप भिडे यांच्याशी त्यांची असलेली दोस्ती. माधवरावांना सामाजिक कार्याची आवड होती. त्यांचे वडील नानासाहेब भिडे हे कल्याणमधील शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांच्या नावाने माधवरावांनी गुरुवर्य नानासाहेब भिडे स्मारक निधी हा ट्रस्ट स्थापन करून दरवर्षी अनेक मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देत असत. अशा प्रकारे ते वडिलांची स्मृती जागृत ठेवत. समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करीत. माधवराव पुणे विद्यापीठातून १९५३ साली इंजिनिअरींग पदवी उत्तिर्ण झाले. त्या परीक्षेत ते विद्यापीठात दुसरे आले होते. त्यानंतर ते अखिल भारतीय रेल्वे सर्व्हिसमध्ये रुजू झाले. पुढे मध्य रेल्वेत आले. सलग २४ वर्षे चर्चगेटला रेल्वे निवासामध्ये राहत होते. रेल्वेच्या अनेक प्रकल्पांत त्यांचा सिंहाचा वाटा होता. विशेषतः दोन्ही घाटांमधील (खंडाळा व कसारा) तिसरी लाईन टाकणे, अनेक नद्यांवरील प्रचंड पूल तसेच दिवा-वसई ही ४२ किलोमिटरची नवीन रेल्वे लाईन टाकणे असे मोठे प्रकल्प कार्यान्वित करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. पुढे रेल्वेमध्ये चिफ ब्रिज इंजिनिअर म्हणून कार्यरत होते.

त्यांनी मध्य रेल्वेत काम करताना अनेक सामाजिक कार्ये केली. रेल्वेमध्ये १०० गरीब कलाकारांचा कोटा निर्माण करून अनेक कलाकारांना रेल्वेत नोकऱ्या देवविल्या. त्यांनी 'मध्य रेल ललित कलामंडळ' स्थापन केले. काही वर्षांनी त्याचेच रूपांतर 'सेंट्रल रेल्वे कल्चरल ॲकॅडमी' स्थापन केली गेली. या माध्यमांतून त्यांनी निधी निर्माण केला. बोरीबंदरच्या पार्सल ऑफिसमधील इमारतीत ५०० आसनांची वातानुकुलीत सभागृहाची निर्मिती केली. त्यांना साहित्य, संगीत व विविध कला यांमध्ये रुची होती. या हौसेपायी त्यांनी अनेक नाटकांत कामे केली आहेत. ते कुठलेही काम जीव ओतून करीत. साहजिकच त्या सर्व कामांत त्यांना यश मिळे. त्यांना उत्स्फुर्त कविता करायला आवडत. अशा १०० च्या वर कविता त्यांनी लिहिल्या आहेत. देव एका माणसाच्या अंगात किती गुण देतो याचे कौतुक वाटते.

त्यांचे वास्तव्य चर्चगेटला रेल्वे निवासात असल्याने त्यांचा संबंध गुजराथी, सिंधी, पंजाबी, मद्रासी अशा सर्व लोकांशी आला. त्यामध्ये अनेक उद्योजक, व्यावसायिक, हॉटेल धंदेवाले होते. त्यांच्यामुळे आपला मराठी समाज मुंबईत असूनही आर्थिकदृष्ट्या खूप मागे आहे. तसचे मराठी समाजात संपत्तीबद्दल बरीच उदासीनता आहे असे लक्षात आले. ही उदासिनता घालविण्याकरिता मराठी समाजातील उद्योग व्यावसायिकांनी एकत्र येऊन आपल्या अडचणी सोडवाव्यात याकरिता 'सॅटरडे क्लब' ही संकल्पना १९८९ पासून राबविली. या संघटनेच्या विविध शाखा स्थापून (वेगवेगळ्या गावांना) त्यांच्या समस्या सोडविण्याकरिता ते मार्गदर्शन करीत. त्याकरिता गावोगावी जात. त्यांच्या संस्थेचे ध्येय वाक्य होते 'एकमेका साहाय्य करू अवघे होऊ श्रीमंत !' त्याकरिता ते उद्योजकांचे मेळावे, अनेक सभा, दूरदर्शनवरून/पत्राद्वारे संपर्क करीत. यातूनच त्यांनी


संपादक मंडळ

आम्ही भिडे अंक ३६ वा

| | |
|---|---|
| संपादक : | श्री. शशिकुमार केशव भिडे |
| कार्यकारी संपादक : | श्री. प्रदीप जनार्दन भिडे |
| संपादक मंडळ : | श्री. दिलीप भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. चिंतामणी भिडे, ले. क. सुनिल भिडे, श्री. विनायक भिडे |
| सल्लागार मंडळ : | श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, सौ. प्रिती भिडे, के. मो. भिडे, श्रीमती शशिताई घुले, डॉ. प्रतिभा भिडे, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे |
| अक्षर जुळणी : | सौ. विनीता डबीर |


### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

९२, शुक्रवार पेठ येथील कार्यालय तात्पुरते बंद आहे. त्याठिकाणी पत्रव्यवहार करु नये. त्या ऐवजी पत्रव्यवहारासाठी पत्ता या ठिकाणी संपर्क/पत्रव्यवहार करावा, ही नम्र विनंती आहे.


पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,

पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

मो. ९६२३०१७४४४


**सर्व जाहिरातदार, बॅनर्सदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.

(१) श्री. महादेव लक्ष्मण भिडे, पुणे (२) सौ. ललिता श्रीधर भिडे, बोरिवली (३) श्री. माधव चिंतामण भिडे (४) श्री. यशवंत शंकर भिडे, दहिसर, मुंबई (५) श्री. गोपाळ भालचंद्र भिडे, निगडी, पुणे.

मराठी उद्योजकांमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद भरवली. त्यांत अनेक तज्ज्ञांना बोलविले. साहजिकच सॅटरडे क्लबच्या आंतरराष्ट्रीय शाखा निघाल्या. तसेच अनेक जण क्लब सदस्य झाले. लाखो रुपयांची निर्यात करण्याचा मार्ग सापडला. त्यांनी चेन्नई, बेंगलोर, हैद्राबाद यांबरोबरच अनेक परदेश दौरे केले. एखादा मनुष्य ध्येयाने प्रेरित झाला की काय काम करू शकतो याचे माधवराव हे उत्तम उदाहरण होते. पण हे सर्व करताना त्यांना अफाट मेहनत घ्यावी लागली.

याच बरोबर त्यांचा दीर्घकाळाचा रेल्वेमधील ब्रिज निर्मितीचा अनुभव घेऊन त्यामध्ये भारतातील नवीन इंजिनिअरांना नवीन सर्व ज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिज इंजिनिअर' ही संस्था स्थापन केली. त्यामध्ये अनेक इंजिनिअर सभासद झाले. त्यांच्या राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांना बोलावून परिषदा घेतल्या. त्यायोगे भारतीय इंजिनिअरांना अत्याधुनिक ज्ञानाची ओळख होईल व त्याचा उपयोग आपल्या देशाला होईल इतका त्यांचा दृष्टिकोन विशाल होता. या त्यांच्या कार्यावर आंध्रचे त्यावेळचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू खूष झाले. त्यांनी हैद्राबादला त्यांच्या कार्यालयासाठी जागा देऊ केली. त्यांनी इंजिनिअरींगबरोबर कायद्याचे ज्ञान व्हावे म्हणून एलएलबी ही पदवी संपादन केली.

सेवानिवृत्तीनंतर माधवरावांनी 'भिडे असोसिएट्स' ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून ते अनेक बँका, आर्थिक संस्था यांना तांत्रिक, व्यवस्थापकीय व वित्तिय सेवा देत असत. ही संस्था भारतातील २४ बँका व अनेक वित्तिय संस्थांना सल्लागार म्हणून मार्गदर्शन करीत असते. या संस्थेच्या देशभरात १६ शाखा असून सर्व शाखाप्रमुख मराठी आहेत.

त्यांनी १९९० च्या सुमारास डोंबिवलीतील प्रसिद्ध गणेश मंदिराचा जीर्णोद्धार केला. ते गणेश मंदिराचे अध्यक्ष होते. गणेश मंदिराचे भव्य व सुंदर नूतनीकरण केले. वैशिष्ट्यपूर्ण कळस, पहिल्या मजल्यावरती वाचनकक्ष, मागील बाजूस ध्यानमंदिर अशा अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या. साहजिकच गणेश मंदिर प्रकाशात येऊन आवक वाढली. त्यातून गणेश मंदिरातर्फे अनाथ महिलाश्रम, वनवासी कल्याण आश्रम, मूकबधीर विद्यालयाला देणग्या देता आल्या.

पुढे पाच वर्षे ते भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष झाले. दरवर्षी वार्षिक संमेलनात प्रतिष्ठानचा निधी कशा प्रकारे वाढविता येईल तसेच भिडे मंडळींची उद्योजकता कशा प्रकारे वाढविता येईल या संबंधी मार्गदर्शन करीत. त्यांना भिडे उद्योजकांबद्दल कौतुक वाटे. जगातील सर्व नवीन गोष्टींबद्दल त्यांना उत्सुकता होती. त्यामधून आपल्या लोकांनी फायदा करून स्वतः व देशाच्या विकासाला कसा हातभार लावता येईल या संबंधी सूचना देत. ते नेहमी सकारात्मक विचार, कष्ट करण्याची तयारी व त्यातून यश संपादन ही त्यांची त्रिसुत्री असे.

असा मनुष्य प्रतिष्ठानला अध्यक्ष म्हणून लाभला हे आपले भाग्यच. आज ते आपल्यात नाहीत. पण त्यांची मार्गदर्शक तत्त्वे, उत्साह, धडाडी आपल्या कायम स्मरणात राहील. भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांना आदरपूर्वक श्रद्धांजली.

– **प्रभाकर शं भिडे**, मो. ९८९२५६३१५४
संपादक, भिडे कुलवृत्त (दुसरी आवृत्ती)

# तूच देवा

माझ्या अबोध जिवाला, तुझ्या हाताचा आधार।
वेळोवेळी तूच देवा, तूच योग्य सल्लागार॥१॥
चुकता पथ माझा, सावरशी तूच देवा।
जन्मोजन्मीचा वारसा, तुझी भक्ती तुझी सेवा॥२॥
काजळ कातर रात्री तुझे प्रकाश किरण।
झिरपती, दूर करती, मनावरचे विविध ताण॥३॥
माझ्या तन–मनाला कोण जपे जीवापाड।
माझ्या बिलोरी स्वप्नांना, तूच केलेस साकार॥४॥
तुला शोधण्यासी देवा धावते मी मंदिरात।
लगिलारे शोध देवा, तूच माझ्या अंतरात॥५॥
जन्मवरी, सावरलेस आता नको रे अंतर।
अंती स्मृती राहू दे, तुझीच रे निरंतर॥६॥

– **सुमती भिडे**, पुणे
फोन २५४४११६१

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि उपकोषाध्यक्ष श्री. चिंतामणी भिडे यांनी आपल्या वैयक्तिक कारणासाठी उपकोषाध्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्या पदावर विश्वस्त श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली यांची नुकत्याच झालेल्या कार्यकारिणी सभेमध्ये निवड करण्यात आली. भिडे प्रतिष्ठानकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन !

# श्रद्धासुमन

नित्याप्रमाणे दुपारी ३ वा. टीव्हीवर बातम्या पाहत होतो आणि माधवराव भिडे यांचे दुःखद निधन झाल्याच्या वृत्ताने धक्काच बसला. पुढील पट्टी 'सॅटर्डे क्लब'चे संस्थापक अशी असल्याने शंकेस जागा राहिली नाही. त्या क्षणी दूरध्वनीवरून सचिव दिलीप भिडे यांना कळविले. प्रतिष्ठानशी २०१० पासून जोडले गेल्यानंतर माधवकाकांशी बरेच वेळा माझा संपर्क आला. भिडे प्रतिष्ठानचे एक संस्थापक, विश्वस्त व त्यानंतर ४/५ वर्षे अध्यक्ष म्हणून मी त्यांना ओळखतो. बाहेरील जगतास ते सॅटर्डे क्लबचे अध्यक्ष, भिडे असोसिएट्स आणि रेल्वे ब्रीज इंजिनिअर्स संघटनेमुळे ते जास्त परिचित होते. आपल्या सातारा संमेलनात त्यांनी अध्यक्षीय भाषणात काढलेले उद्‌गार 'माणसाने **Retire** झाले तरी **Retyred** होऊन नव्या उमेदीने आयुष्य जगावे.' त्यांच्या शेवटपर्यंत उत्साहाने व धडाडीने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीची कल्पना देतात. प्रतिष्ठानला आज लाभलेल्या उंचीत त्यांचा बहुमोल वाटा आहे. त्यांच्या जाण्याने प्रतिष्ठानची न भरून येणारी क्षति झालेली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

– ले. क. (नि) सुनिल भिडे, पुणे
मो. ९६२३०१७४४४

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जुलै

१. श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव १
२. सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे १
३. श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी २
४. श्री. शशिकुमार के. भिडे, पुणे २
५. श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे ५
६. श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण ७
७. श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे ८
८. चि. अर्जुन विक्रम भिडे, पुणे १३
९. श्री. वि. क. भिडे, नाशिक १४
१०. श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली १५
११. सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई १५
१२. सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई १६
१३. श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली १७
१४. श्री. अनिल वामन भिडे, पुणे १७
१५. श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल २०
१६. सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा २२
१७. कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे २३
१८. श्री. बळवंत भिडे, अंमळनेर २३
१९. श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे २३
२०. श्री. विनय विष्णू भिडे, पुणे २४
२१. चि. कपिल गणेश भिडे, पुणे २५
२२. सौ. स्मिता भिडे, मुंबई २७
२३. सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे २७
२४. श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे २८
२५. श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली २८
२६. श्री. श्रेयस श्रीकृष्ण भिडे, मालाड ३०
२७. सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज ३०
२८. सौ. आरती विक्रांत भिडे, पुणे ३०

### ऑगस्ट

१. सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ ३
२. श्री. विद्याकर वासुदेव भिडे, पुणे ५
३. कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा ६
४. श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे ६
५. सौ. योगिनी माधव भिडे, पुणे ७
६. चिं. ओंकार मिलिंद भिडे, पुणे १०
७. सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई ११
८. श्री. अमित दिलीप भिडे, पुणे १२
९. श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर १३
१०. श्री. निळकंठ भिडे, नाशिक १३
११. सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे १४
१२. कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे १५
१३. ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे १५
१४. श्री. प्रशांत सदानंद भिडे १६
१५. श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे १८
१६. डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ १९
१७. श्री. प्रणव प्रसाद भिडे, पुणे २०
१८. सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली २१
१९. श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे २१
२०. सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे २१
२१. सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे २२
२२. चि. अनय शुभानन भिडे, २२
२३. सौ. गौरी प्रदीप भिडे, डोंबिवली २३
२४. श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल २६
२५. श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली २६
२६. श्री. सुकृत सुभाष भिडे, सांगली २६
२७. श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली २७
२८. श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे २८
२९. सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ २८
३०. सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे ३०
३१. श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम ३१
३२. श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर ३१
३३. श्री. प्रशांत सदानंद भिडे ३१

### सप्टेंबर

१. कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली १
२. श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली २
३. श्री. अनंत हरी भिडे, मालाड २
४. श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे ३
५. सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण ३
६. कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव ४
७. सौ. माधवी सारंग भिडे, सांगली ४
८. आर्या चारुदत्त भिडे, माभळे ६
९. श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे ७
१०. श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण ७
११. मनश्री मंदार भिडे, चिपळूण ८
१२. श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे ८
१३. सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर ९
१४. श्री. अमित अरविंद भिडे, पुणे १०
१५. कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे १०
१६. श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे ११
१७. श्री, अनंत शरद भिडे, चिपळूण १२
१८. श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा १३
१९. सौ. मानसी चारुदत्त भिडे, माभळे १४
२०. श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण १५
२१. हर्षदा व्ही. भिडे, रायगड १५
२२. श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण १५
२३. श्री. आनंद भिडे, मुंबई १६
२४. सौ. लता नारायण भिडे, जबलपूर १६
२५. श्री. महादेव लक्ष्मण भिडे, पुणे १७
२६. सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे १८
२७. कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली १८
२८. श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे १८
२९. श्रीमती ललिता र. केसकर २०
३०. सौ. रेणुका केदार भिडे, पुणे २२
३१. कु. गौरी विनोद भिडे, औरंगाबाद २२
३२. चि. जयराज विनोद भिडे, औरंगाबाद २२
३३. श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद २५
३४. कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई २६
३५. कु. सारंग संतोष भिडे, ठाणे २६
३६. श्री. चैतन्य भिडे, नाशिक २६
३७. श्री. रोहित विजय भिडे, ठाणे २७
३८. सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा २९
३९. श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे २९
४०. श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण २९
४१. सौ. मानसी विक्रम भिडे, पुणे ३०

# अभिष्टचिंतन !



ज्या कुटुंबातील स्त्री संस्कारी, कर्तव्यदक्ष आणि कर्तबगार असते ते संपूर्ण कुटुंबच संस्कारी होऊन जाते आणि त्या कुटुंबाची बौद्धिक वृद्धी व्हावयास वेळ लागत नाही. ह्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे आपल्या भिडे कुटुंबातील ज्येष्ठ आणि पुण्याच्या सुमतीकाकू भिडे. सुमतीकाकू आपल्या 'आम्ही भिडे' अंकामध्ये आपल्या प्रतिभाशक्तीने नेहमीच विविध लेखन करीत असतात हे आपणा सर्वांना माहीतच आहे.

सुमतीकाकूंचा आणि माझा परिचय भिडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून झाला. सुमारे ४ ते ५ वर्षांपूर्वी मी एक दिवस सकाळी ९ चे सुमारास त्यांचे घरी गेलो होतो. सकाळी गेल्याबरोबर त्यांनी मला एक लाडू व पेढा दिला. मी त्यांना सहज विचारले की हा पेढा कसला ? त्यावर त्या म्हणाल्या, आज आमच्या विवाहाला ७० वर्षे पूर्ण झाली. हे ऐकून खूप आनंद झाला.


॥ श्री गजानन प्रसन्न ॥

**स्नेहांकुर**

राहण्याची उत्तम सोय
एसी/नॉन एसी रूम्स उपलब्ध.

**श्री. गणेश महादेव भिडे**
वरचा पाट, मु. पो. ता. गुहागर,
मो. ९४२११ ३६९६८, ९४०५७ ४७६६८


नुकताच जूनमध्ये त्यांचा ९० वा वाढदिवस साजरा झाला. ह्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या 'यात्रा' ह्या कथासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्याच आप्तेष्टांच्या हस्ते झाले. ह्या अगोदरही त्यांचे दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. सुमतीकाकू शाळेत असल्यापासूनच त्यांना लेखनाची आवड होती. त्यांची पहिली लघुकथा माहेर या अंकामध्ये प्रसिद्ध झाली. त्यांच्या काव्यलेखनाची सुरुवात प्रासंगिक गाणी रचण्यातून झाली. स्वरचित मंगलाष्टके, मातृभोजनाचे गाणे, बारसे, डोहाळजेवण अशा प्रसंगी नातेवाईक व मैत्रिणींच्या कार्यक्रमांमधून गायला सुरुवात केली. निसर्गावर वेगवेगळ्या कविता लिहून त्या कवितांचे संग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. काकू फक्त लेखिका किंवा कवीच आहेत असे नाही, तर वाचन, कथाकथन, शिवण, वीणकाम, पाककृती ह्यांमध्ये सुद्धा बक्षीसे मिळविली आहेत. लेखन वाचनाबरोबर नाट्यअभिनय सुद्धा केलेला आहे. त्यांनी उत्तमरित्या बॅडमिंटन खेळून त्यामध्ये सुद्धा नैपुण्य मिळविले आहे. मनासारखे सर्व कला गुणांची आवड असणारे कै. वामनकाकांसारखे पती लाभले आणि संसाराचा रथ चालविताना एकत्र कुटुंबात घर, नातेवाईक सांभाळून आपले कलागुणही त्यांनी विकसित केले. आयुष्यात काय करायचे हा प्रश्नच त्यांना कधी पडला नाही. मार्च २०१८ मध्ये त्यांच्या 'एका घरात दोन पुनर्जन्म' ह्या कथेला नुकतेच पारितोषिक मिळाले. ह्यावरून आजमितीला संधी मिळेल त्याप्रमाणे नव्वदीमध्ये सुद्धा आपल्या कलेचा ठसा उमटवित आहेत. विशेष म्हणजे कोणाचेही मार्गदर्शन नसताना सासरी वा माहेरी कोणी लेखक वा कवी हा वारसा नसताना सुद्धा त्या लेखिका व कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहेत हे विशेष कौतुकास्पद आहे.

कलेबरोबरच सामाजिक क्षेत्रात सुद्धा त्या अग्रेसर आहेत. त्या ज्या सोसायटीमध्ये राहतात तेथील स्त्रियांचे कलागुण विकसित व्हावेत व त्यांना व्यासपीठ मिळावे ह्यासाठी नटराज महिला मंडळाची स्थापना त्यांनी केली. ही कला जोपासताना त्यांनी आपल्या एकत्र कुटुंबाला सुद्धा जपले आणि पुढील पिढीवर संस्कार करून आपल्या तिनही मुलांना उच्चपदस्थ व उच्च शिक्षित केले. त्यांचे एक चिरंजीव मेजर जनरल संजय ह्यांनी आपल्या पुणे येथे झालेल्या २०११ च्या भिडे कुल संमेलनामध्ये अध्यक्षस्थान भूषविले आहे.

त्यांचे अनेक लेख, कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रसिद्ध होत असतात तसेच त्या संपादक मंडळामध्ये सल्लागार म्हणून आहेत. काही वेळा अंकामध्ये एकादी जागा शिल्लक असते त्यावेळी सुमतीकाकूंना फक्त फोन केला तरी त्या वेळोवेळी आम्हाला मदत करतात. नव्वदीमध्ये सुद्धा त्यांचा हा उत्साह तरुणांना लाजवेल असाच आहे. त्यांच्या ह्या कर्तबगारीला भिडे प्रतिष्ठानकडून त्रिवार वंदन आणि उत्तम आरोग्यासाठी त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. सरतेशेवटी लेख संपविताना मी एवढेच सांगेन की –

महीमानं यदुत्कीर्त्य तव संहीयते वचः।
क्षमेण तद्शक्त्या वा न गुणानाभियतया॥

तुमचा महीमा गाता गाता आम्हाला कुठेतरी थांबावे लागते. पण त्याचे कारण एक तर गाता गाता आम्ही दमतो किंवा तुमच्या गुणांचा आम्हाला हिशेब ठेवता येत नाही.

– **दिलीप भिडे**, विश्वस्त, सचिव

## भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !



# आर. जी. ज्वेलर्स

## चोख सोने-चांदी व अद्ययावत दागिन्यांचे दालन


पंचमुखी प्लाझा, गाळा नं. १, १४९, सदाशिव पेठ,
श्री पंचमुखी गणेश मंदिरासमोर, सातारा

**प्रोप्रा. राहुल घाडगे**

मो. ९९२२८९९९९८


## भिडे कुलातील सर्व यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन!

**१) कु. तनया मुकुंद भिडे, सांगली**




शालांत परीक्षेत इ. १० वी. सांगली येथील प्रज्ञा प्रबोधिनी शाळेमध्ये शिकत होती.
५०० पैकी ४८५ गुण - ९७%

**२) चि. विश्वेश मुकुंद भिडे, कर्नाटक**



इ. १० वी, ६२५ पैकी ५९५ गुण - ९५.२०%

**३) चि. अथर्व सुनिल भिडे, पुणे**



इ. १० वी, ५०० पैकी ४७० गुण - ९४%

# कौतुक

मागील अंकात (एप्रिल २०१८) आपण भिडे कुल बंधू-भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती सॉफ्टवेअरमध्ये करण्यासाठी प्राथमिक तयारी करण्यासाठी दुसऱ्या कुलवृत्तातील काही माहिती संगणकावर (सुमारे ७५० पाने) तयार करण्यासाठी काही भिडे कुलोत्पन्नांनी सहकार्य केल्यास हे काम लवकर होईल अशा तऱ्हेचे आवाहन आम्ही भिडे अंक, फेसबुक आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून आपण केले होते. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे हे काम आपल्या नियोजित वेळेपेक्षा कमी वेळात आपण पूर्ण केले त्याबद्दल ह्या कामामध्ये सहकार्य केलेल्या सभासदांचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे वतीने सर्वांचा आभारी आहे. परंतु एवढ्यावरच आपले काम पूर्ण झालेले नाही. अजूनसुद्धा ह्यामध्ये आपल्याला खूप काम करायचे असून त्या त्या वेळेप्रमाणे आपण संपर्कात राहू या. 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ'. सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद आणि असेच सहकार्य सर्वांनी करावे ही विनंती. ह्या कामाचे मुख्य सारथी श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे हे स्वतः सक्रिय सहभागी झाले. तसेच ह्या कामामध्ये विशेष हातभार लावणारे इतर सभासद खालीलप्रमाणे......

श्री. मिलींद भिडे, ठाणे (३९७ पाने), श्री. नरेंद्र भिडे, ठाणे (१२९ पाने), श्री. राजेंद्र कुमार भिडे, डोंबिवली (२५ पाने), कु. ऐश्वर्या भिडे, पुणे (३८ पाने), ॲड. अलका भिडे, कल्याण (३९ पाने), सौ. राधिका भिडे, पुणे (२२ पाने), श्री. अजित भिडे, पुणे (२३ पाने), सौ. संपदा भिडे, दादर (१६ पाने), श्री. राजेंद्र भिडे, दादर (१२ पाने), सौ. अर्चना भिडे, मालाड (३० पाने)

पुन्हा एकदा सर्वांना धन्यवाद.

**- दिलीप भिडे**
विश्वस्त/सेक्रेटरी

# मायलेकींचा स्कूटर प्रवास !

(दै. लोकसत्ता सौजन्याने)

पुण्याच्या मनाली भिडे यांनी आपल्या १२ वर्षांच्या मुलीसमवेत १०० सीसीच्या स्कूटरवरून पुणे ते कन्याकुमारी ते पुणे हा तीन हजार ३४४ किमीचा प्रवास नुकताच यशस्वीपणे पूर्ण केला. त्यांच्या या अनोख्या सफरीविषयी ...

रुटीन आयुष्य जगण्याचा सगळ्यांना कंटाळा येतो. पण इच्छा असूनही अनेकांना रुटीनच्या पलीकडे जाता येत नाही. काही जणांमध्ये मात्र सळसळता उत्साह असतो. तो त्यांना गप्प बसू देत नाही. केवळ लोकांनी आपलं कौतुक करावं, वृत्तपत्रांत फोटो छापून यावेत म्हणून नाही तर काहीतरी आगळंवेगळं करून दाखविण्याच्या जिद्दीपोटी सगळ्या अडचणींवर मात करीत ते आपले स्वप्न पूर्ण करतात. मग कुणी मुंबई ते धरमतरची खाडी पोहून जातात, कुणी ब्रिटिश खाडी पार करतात, कुणी सायकलने मुंबई-गोवा करतात तर कुणी मोटारसायकलने लेह-लडाखला वळसा घालतात. पुण्याच्या मनाली भिडे यांनी आपल्या १२ वर्षांच्या लेकीसह १०० सीसीच्या स्कूटरवरून पुणे ते कन्याकुमारी हा ३ हजार ३४४ किमी प्रवास अलीकडेच यशस्वीरित्या केला.

सर्वसाधारणपणे दिल्ली, लेह-लडाख, खारदुंगला पास, कन्याकुमारी असे लांबवरचे प्रवास टू-व्हिलरने करावयाचे झाल्यास २५०-३०० सीसी अशा पॉवरफुल इंजिन असलेल्या मोटारसायकलवरूनच केले जातात. पण मनाली यांनी हा आठ दिवसांचा खडतर प्रवास चिकाटीने १०० सीसीच्या स्कूटरवरून केला.

उत्तम सायकलपटू असलेल्या मनाली यांनी याआधी पुणे-गोवा, पुणे- कोल्हापूर, पुणे-सोलापूर-निपाणी, पुणे-महाबळेश्वर, मनाली-खारदुंगला हा प्रवास सायकलवरून केला आहे. लेकीसमवेत त्यांनी या सफरीवर जायचं ठरवलं तेव्हा कुटुंबीयांनी काळजीपोटी त्यांना विरोधच केला. सफर यशस्वीरित्या पूर्ण करून परतल्यावर मात्र मनापासून कौतुक केले.

मनाली आणि मन्वा या दोघींनी सकाळी सात वाजता प्रस्थान केले. कोल्हापूरमध्ये त्यांचा मावसभाऊ आणि त्याचा मित्रही त्यांना येऊन मिळाले. तीन दिवसांत एक हजार ६१६ किमीचे अंतर पार करत हावेरी-सालेम करत त्या कन्याकुमारीला पोहोचल्या. या आठ दिवसांत या दोघींनी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ अशी पाच राज्ये पार केली. निसर्गसौंदर्य भरभरून डोळ्यांत आणि कॅमेऱ्यामध्ये साठवून घेतले. दक्षिणेत सर्वांना येते तशी भाषेची अडचण त्यांनाही आली.

विशेष म्हणजे निघताना त्यांनी कोणत्याही हॉटेलचे बुकिंग केले नव्हते. अंधार पडल्यावर स्कूटर चालवायची नाही, चांगले हॉटेल शोधून त्यात मुक्काम करायचा, सकाळी अंघोळ, नाष्टा करून सफर पुढे सुरू, प्रवासात मिळेल ते खात आणि मिळेल ते पाणी पित त्यांनी ही सफर पूर्ण केली. मनाली यांनी निघण्यापूर्वी स्कूटर दुरुस्तीची जुजबी माहिती करून घेतली होती. पण स्कूटर नवीन आणि टायर ट्यूबलेस असल्यामुळे स्कूटरने या संपूर्ण प्रवासात त्यांनी कुठेही दगा दिला नाही.

मुलीच्या पाठीवर ओझे नको म्हणून त्यांनी तिच्या पाठीवर अगदी सॅकसुद्धा दिली नाही. कमीतकमी सामान आणि निवडक औषधे त्यांनी



पायाशी असलेल्या मोकळ्या जागेत ठेवली. प्रवासात वारा लागून मुलीला डुलकी लागली तर ती पडू नये म्हणून या प्रवासात तिला स्वतःशी ओढणीने बांधून ठेवलं होतं.

मुंबई-कन्याकुमारी वा पुणे-कन्याकुमारी हा प्रवास बाइकने करणारे बहुतेक जण तो एकेरीच करतात. म्हणजे बाइक ट्रेनमध्ये टाकून ट्रेनेच परतीचा प्रवास करतात. मनाली-मन्वा या मायलेकींनी मात्र हा दुहेरी प्रवास स्कूटरने केला म्हणून त्यांचे विशेष कौतुक. अशा प्रकारे सफर करणाऱ्या या दोघी भारतातील पहिल्याच पर्यटक असाव्यात.

या सफरीबद्दल मनाली उत्साहाने सांगतात, ''पुण्याहून निघताना स्कूटर सुरू केल्यानंतर माझ्या मनात भीती वा शंकेचा विचारही शिवला नाही. आपला प्रवास चांगलाच होणार आणि आपल्याला चांगलेच लोक भेटणार अशी सकारात्मक भावना मनात होती आणि झालेही तसेच. मुख्य म्हणजे माझी ऊर्जा. माझी लेक माझ्याबरोबर होती. तिने मला पुरेपूर साथ दिली. रोज १२ तास स्कूटरवर बसूनही ती कधी कंटाळली नाही. रोज नव्या उत्साहाने ती तयार होत होती. अवघ्या १२ वर्षांच्या माझ्या चिमुरडीचा हा उत्साह बघून मलाही रोज ऊर्जा मिळत होती. आमचे आई-मुलीचे नाते या ट्रिपमुळे निश्चितच आणखी घट्ट झाले आहे.

पुण्याहून निघाल्यावर आम्ही कोल्हापूरमार्गे हावेरीला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी बंगळुरूला प्रचंड गर्दीत अडकलो. बंगळुरूला प्रचंड प्रदूषण होते. तिथून बाहेर पडून चित्रदुर्ग, सिरा, होसूरमार्गे सालेमकडे निघालो. आतापर्यंत कुठेही टोल नव्हता. पण होसूरला जाताना नाइस रोडवर टोल लागला. मात्र नाइस रोड खरोखरच नावाप्रमाणे छान आहे.

**निवेदन :** आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणींकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.

कुठेही लहानसादेखील खड्डा नाही. जणू हवेत स्कूटर चालवतोय असंच वाटत होतं. आजूबाजूचं निसर्गसौंदर्य डोळे शांतवणारे होते. वाटेत मदुराई मंदिर लागलं. ते भव्य मंदिर आणि तिथल्या खांबांवरची कलाकुसर बघून स्तिमित झालो आणि सत्तूरमार्गे तिसऱ्या दिवशी कन्याकुमारीला पोहोचलो. कन्याकुमारीला वेळेत पोहोचल्याने सूर्यास्त पाहता आला. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून सुर्योदय पाहायला बाहेर पडलो. विवेकानंद स्मारक व बंगालचा उपसागर, हिंदी महासागर आणि अरबी समुद्र या तीन समुद्रांच्या संगमावरचा विलोभनीय सूर्योदय पाहिल्यावर कष्टांचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

परतीच्या मार्गावर मात्र स्कूटरचा वेग जरा कमीच ठेवून किनारा मार्ग धरून निसर्गसौंदर्य डोळ्यांत साठवत, रमतगमत निघालो. नारळाच्या बागांशेजारून, समुद्र किनाऱ्याच्या अगदी जवळून स्कूटर चालविण्याचा आनंद घेतला. कोची, अलपुझाचा समुद्रकिनारा पाहिला. व्हेतानापल्ली, कोझिकोड, चेमनजेरी, कन्नूर करत मंगळूरला पोहोचलो. मंगळूरहून सकाळी सहा वाजता निघताना लक्षात आलं की स्कूटरचा टायर पंक्चर झाला आहे. पंक्चर काढण्यासाठी खूप शोधाशोध केली. रिक्षावाल्यांना खाणाखुणा करून टायर पंक्चर झाल्याचे सांगितले. तिथे साडेआठशिवाय दुकाने उघडत नाहीत, एका रिक्षावाल्याने एका घराचे दार ठोठावून एका माणसाला उठविले. त्याने झटकन पंक्चर काढून दिले.

पुढे पणजीवरून सावंतवाडी, आंबोली, आजरा, निपाणी, कोल्हापूर, सातारा करत महाबळेश्वर गाठले. वेण्णा लेकवर जरा वेळ विसावलो आणि आठव्या दिवशी पुण्याकडे प्रस्थान केले.

मायलेकींची ही साहसयात्रा ऐकून कुणाच्याही मनात प्रश्न येतील की प्रवासात दगदगीमुळे येऊ शकणारं अस्वास्थ्य, थंडी-वारा, धुळीचा त्रास झाला नाही का ? रात्री राहायचे कोठे, ते हॉटेल, तिथला स्टाफ चांगला असेल का ? भाषेची, खाण्याची, पाण्याची अडचण या सगळ्या संभाव्य त्रासांचा विचार करता आणि विशेषतः आजकालच्या काहीशा असुरक्षित वातावरणात या मायलेकींना इतक्या लांबवरचा प्रवास, तोही स्कूटरवरून करताना मनावर दडपण आलं नाही ? रस्ता मुंबईतला असो वा पुण्यातला, आजकाल वाहनांची प्रचंड गर्दी असते. प्रत्येकालाच पुढे जायची घाई... त्यातही सगळेच वाहतुकीचे नियम पाळतात असे नाही. त्यामुळे दुचाकीवरून प्रवास म्हणजे प्रत्येक किलोमीटरला धोक्याचा सामना ! एवढा लांबचा प्रवास करताना आपण जिवाशी खेळतो आहोत असं नाही या मायलेकींना वाटलं ?

मनाली यांचा यावरील उत्तर मोठं विलक्षण आहे. त्या म्हणतात, ''स्त्री म्हणून तथाकथित सुरक्षित चौकटीत राहणे मला पसंत नाही. मी सायकलने हजारो किमी. प्रवास केला आहे आणि सायकलच्या तुलनेत स्कूटर तर कितीतरी आरामदायी. मी विश्वासावर जगते, माणुसकी अनुभवते. प्रवासात विविध भागांतील लोकांचे स्वभाव, संस्कृती, वृत्ती जाणून घेते. मला माणसे जाणून घ्यायला, भटकायला आवडते. रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरांसमवेत, महिलांसमवेत गप्पागोष्टी करायला, त्यांच्याबरोबर फोटो काढायला आवडते आणि मी ते या प्रवासात मनमुराद केले. हे जग खूप सुंदर आहे. ते अनुभवायला हवे. माझ्या मुलीनेही ते पहावे, अनुभवावे असे मला वाटते. म्हणून निर्धास्तपणे तिला घेऊन गेले. हे सुंदर जग अनुभवण्यासाठी मुलींनी अगदी निर्धास्तपणे घराबाहेर पडावे.''

मनाली भिडे यांना खरं तर हा प्रवास सायकलवरून करायचा होता. त्यासाठी पुरेसे सहकारी न मिळाल्यामुळे त्यांनी स्कूटरचा पर्याय निवडला.

(दै. लोकसत्तावरुन साभार)

## माहे एप्रिल ते जून २०१८ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. यशवंत पुरुषोत्तम भिडे, पुणे | ९००/- | आजीव सभासद |
| २) | सौ. वर्षा भिडे, अमेरिका | १,०००/- | आजीव सभासद |
| ३) | सौ. प्रमोदिनी भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ४) | सौ. शालिनी किशोर ठोंबरे (भिडे), पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ५) | श्री. अनय शुभानन भिडे, बोरिवली | १,०००/- | आजीव सभासद |
| ६) | सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे (भिडे), घाटकोपर | १,०००/- | आजीव सभासद |
| ७) | श्री. धुंडिराज दत्तात्रय भिडे, मेंढापूर (सोलापूर) | १,०००/- | आजीव सभासद |
| ८) | सौ. आकांक्षा आशिष भिडे, नालासोपारा | १,०००/- | आजीव सभासद |
| ९) | श्री. आशिष धुंडिराज भिडे, नालासोपारा | १,०००/- | आजीव सभासद |
| १०) | सौ. क्षमा उमेश बापट, फोंडा गोवा | १,०००/- | देणगी |
| ११) | सुजाता सखाराम भिडे, डोंबिवली | १,०००/- | देणगी |
| १२) | सौ. अर्चना संजय भिडे, मालाड | १,०००/- | आजीव सभासद |
| १३) | श्री. अभिषेक सुरेंद्र भिडे, इंदौर | १,०००/- | आजीव सभासद |
| १४) | सौ. वर्षा भिडे, अमेरिका | १,०००/- | देणगी |
| १५) | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | १,०००/- | देणगी |
| १६) | श्री. मिलिंद पुरुषोत्तम भिडे, पुणे | ५,०००/- | देणगी |
| १७) | सौ. सुशिला व श्री. प्रभाकर शंकर भिडे, पुणे | १०,०००/- | शैक्षणिक निधी देणगी |
| १८) | कु. स्वानंदी संदीप भिडे, अंमळनेर | १,०००/- | वाढदिवस देणगी |
| १९) | श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | ५००/- | देणगी |
| २०) | डॉ. सौ. मीनल महेश भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २१) | श्री. अरुण शंकर भिडे, बोरिवली | १,०००/- | आजीव सभासद |
| २२) | मालती मधुसुदन अभ्यंकर (भिडे) मालाड | १,०००/- | आजीव सभासद |
| २३) | श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २४) | श्री. आल्हाद प्रमोद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २५) | सौ. माधुरी प्रसाद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २६) | कु. प्रचिती प्रसाद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २७) | चि. प्रणव प्रसाद भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| २८) | श्री. मिलिंद भिडे, छत्तीसगड | १०,०००/- | देणगी |
| २९) | श्री. शिरीष सुरेश भिडे, नोएडा | १५,०००/- | शैक्षणिक निधी देणगी |

## ती

तो बोलत गेला, ती ऐकत गेली
संसाराची चाके दोन, ऐकले होते कधीतरी
एकाच चाकावर भार, ती ओढत गेली
तो हिणवत गेला, टोमणे मारत गेला
ती सहन करत गेली, सावित्रीचे व्रत
निष्ठेने करत गेली
त्याने अपमान केला, तिने तो ही गिळला,
संसाराला जमेल तसा पैशानेही आधार दिला
हे घर माझे, तरीही ती ऐकत राहिली
एवढे सर्व झाले तरी, तिचीच लाचकी निघाली
संसाराची सार्थकता झाली, धरणी माय आता तरी,
पोटात घे तू तिला, मग तरी किंमत कळेल,
का तिची त्याला ?

– सौ. प्रिती भिडे, पुणे
मो. ९९२२९४४०८२

## रजनी

रात्रीत सुखाच्या, अलगद मिटता हे नयन,
तो हळूच बोले कानी, बदलून जराशी कूस
मिठीत तुझ्या मज, गवसले सर्व ते सुख,
परी जावे म्हणता, ना निघतो माझा पाय
ती अलगद बोले, घालून विळखा सख्यास,
उत्तररात्र अशीच रंगू दे, पुन्हा तुझ्या कुशीत
विसरु दे माझे भान, नजरेला मिळता नजर,
नाही ठेवायचे बाकी, कसलेच आता हिशोब
घे दान सुखाचे पुन्हा, जे पडले आता पदरात,
एक एक उलगडू दे लडी, हळुवार ह्या स्पर्शात
मज गुंतुन जाऊ दे पुन्हा, तुझ्या मोह पाशात,
लहर सुखाची बरसू दे पुन्हा, अशी तनामनात

– सौ. स्नेहल विजय भिडे, पुणे
मो. ९८१९३९८०४३

## आवाहन

९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणीमधील रु. १०० चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केले आहे. त्यामुळे आश्रयदाता रु. १०,०००, हितचिंतक रु. ५,००० आणि आजीव सभासद रु. १,००० हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. जे सभासद रु. १०० भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घ्यावे. अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे.

**शिष्यवृत्ती विद्यार्थिनींसाठी ...** भिडे कुलोत्पन्नांपैकी गरजू व हुशार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी 'प्रदीप व डॉ. शीला भिडे शैक्षणिक मदत'मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत/ शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले नाव, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरित पाठवावी. सदरहू शिष्यवृत्ती/ मदत विनापरतफेडीची आहे ह्याची नोंद घ्यावी.

## नम्र सूचना

**ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींना संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.**

| | |
|---|---|
| **प्रशांत भिडे, सातारा** | **ले.क. सुनिल भिडे, पुणे** |
| ७७७६०२०७७९ | ९६२३०१७४४४ |
| **सौ. संपदा भिडे, मुंबई** | **प्रदीप ज. भिडे, डोंबिवली** |
| ९८१९९५१३९१ | ९८९२५०४०४२ |

## भरवसा

माहीत नसते कोण देईल कुठवर साथ
तरीही मनात मारून ठेवतो गैरसमजाची गाठ
काहीच नाही भरवसा कोण उद्या कुठे असेल
कोणाचा श्वास असेल, उद्याचा सूर्य कोण बघेल
सांगू शकतो कुणी खात्रीने मी इतके जगणार
कुणी साथीला नसले तरी एकट्याने चालणार
साथ लागते प्रत्येकाला, कुणाची ना कुणाची
तिथे कामी येत नाही, कितीही रास पैशाची
तरीही नाही करत आपण सहन कुणालाच
सदा कदा नावे ठेवतो देवाला किंवा दैवालाच
मरण्याआधी सर्वांना देऊन टाकावी माफी
स्वस्थ मरण येण्यासाठी एवढेच आहे काफी
ध्यानात असावे आपणही नाही जगावेगळे
काहीच चुका न करणारे, एकदम सोवळे
राग अबोला गैरसमज हे आहेत शत्रू आपले
स्वस्थ निरोगी जीवनासाठी पाहिजेत दूर सारले
आजचा दिवस खरा, जे घडले भूतकाळ होता
पछाडून जातो आपण, हे भूत मानेवर बसता
मनी आनंद आनंद भरून चालावे आयुष्य
कुणी कुणाचे घडवत, बदलत नाही भविष्य
हात धरावे हातात, मनामध्ये प्रेम भरावे
माफ करणाराच मोठा असतो हे ध्यानी ठेवावे

– सौ. प्रिती भिडे, पुणे
मो. ९९२२९४४०८२

# अनुभव

आपल्या भिडे कुलात अजूनही आमच्या मुलांसारखी मातृपितृभक्त मुलं आहेत. हे भिडे कुलाचे भूषणच आहे. माझा येथील अनुभव सांगते. आमच्या नटराज सोसायटीमधीलच माझ्या कित्येक मैत्रिणींना इथेच घरदार नातवंडे असूनही अत्यंत हालाखीत राहावे लागत आहे. एक–दोन उदाहरणे देत आहे. आमच्या घरी नेहमी येणारे बेन्द्रे पती–पत्नी. त्यांचा नुकताच वृद्धाश्रमात अंत झाला. मुलाने वृद्धाश्रमात टाकले. चक्रदेव पतीपत्नी. मुलगी इथेच (अर्थातच ही सर्व मुले वेगळीच राहात आहेत.) वृद्धाश्रमात दोघांचा अंत झाला. माझी मैत्रिण ३० वर्षांपासूनची. त्यांची मुलगा–मुलगी सर्व पुण्यात जवळच राहतात. इतकी शोचनीय दोघांची स्थिती आहे. मी परवाच जाऊन आले. आर्थिक स्थिती बेताची. दोघेही पिकली पानं. गोखले काकांना पॅरॅलिसिस झालेला. वैजूस तापाने ग्रासलेले, जेवणाचा डबा लावला आहे. घरकामास माणसे ठेवण्याची ऐपत नाही. आम्ही मदत करण्यास तयार आहोत पण मुलास वाईट वाटेल म्हणून मदत घेण्यास नकार. त्यांचे शेजारीच सुविधा तांबोळी. एकटीच बंगल्यात राहते. मजा म्हणजे आई–वडिलांची चंदनवृक्षाची जात. घाव घालणाऱ्या मुलांनाही म्हणतील ''बाळा तुला घाव घालताना लागले नाही ना ?'' वाढते वृद्धाश्रम, एकाकी जीवन, वृद्धांच्या वाट्याला, अशा समाजामधे सामान्य व्यक्तींचा ९० वर्षांचा वाढदिवस थाटात करणे व कथासंग्रहाचे प्रकाशन करणारी मुले–सुना–जावई असणे ही देवाचीच कृपा ! त्याचप्रमाणे लहान वयात लग्न झाले. सासरी सासू–सासरे आईवडिलांप्रमाणेच माया करणारे मिळाले. अत्यंत गरिबीतही आनंदाने, सुखाने राहता येते हे त्यांच्याचकडून शिकले. भावजींची आणि माझे जिव्हाळ्याचे नातं जुळलं. त्यांना बहीण नाही आणि मला भावंडांत राहण्याची सवय. ते नेहमी म्हणत हीच माझी बहीण आणि वहिनी पण ! संगतीची सर्व माणसे अशी मिळणे ही देवाची देणगीच ! मंगल, नंदा, चित्रा, विनय, गौरी ह्या पुतण्या, विनय वगैरेंनीही हाच जिव्हाळा ठेवलाय. माझा ९० वर्षे पूर्तीचा कार्यक्रम मुलं आणि सुनांनी कौतुकाने साजरा केला.

ज्या भिडे कुलातील व्यक्तींना वाचनाची आवड असेल त्यांना माझा 'यात्रा' हा कथासंग्रह देण्यात येईल. श्री. दिलीप भिडे, ९६५७५४१२३६ यांना कळवावे. आपले २०१८ चे वार्षिक संमेलन गुहागर येथे झाले. त्यावेळी मालगुंड येथून श्रीमती वैद्य (माहेरच्या भिडे) संमेलनास आल्या होत्या. ह्या अनोळखी बाईंचा मला फोन आला होता. प्राजक्तमधील तुमची 'मुखवटा' ही कविता वाचली. मनाला स्पर्श करून गेली. आवडली. माझा मुलगा सहवासमध्ये राहतो. त्याच्याकडे मी जुलैमध्ये येणार आहे. तेव्हा तुम्हाला भेटायला येईन. मला असे वाटले माझ्यावरच कविता लिहिली आहे.

हे ऐकून लिहिण्याचे सार्थक झाल्याचे वाटले.

– सुमतीकाकू (भिडे), पुणे

# भिडे कुलसंमेलन जानेवारी २०१९

कळविण्यास आनंद होतो की, २००३ नंतर पुन्हा एकदा जानेवारी २०१९ मध्ये भिडे कुल संमेलन सांगली येथे घेण्याचे निश्चित केले आहे. सांगलीचे श्री. श्यामराव, डॉ. सुभाष, शैलेश इत्यादी भिडे मंडळी सक्रिय असल्यामुळे आपण सांगली येथील भिडे कुल संमेलन यशस्वी करू असा दृढविश्वास आहे. भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. कुमार भिडे यांच्या अध्यक्षतेच्या काळात, त्यांच्या कायमस्वरूपी वास्तव्य असलेल्या भूमीत संमेलन व्हावे ही आमची सर्वांचीच आत्यंतिक इच्छा. २००३ मध्ये सांगलीमध्ये यशस्वी करताना भिडे यंत्र लोह वस्तू केंद्र आणि भिडे कुटुंबीयांचा मोठा वाटा होता. परंतु कालपरत्वे आणि वयोमानाने ही मंडळी मनाने व आर्थिक बळ देण्यास सक्रिय असली तरीसुद्धा मानवीबळ कमी असले तरी सुद्धा हे संमेलन तितक्याच दिमाखात साजरे होणार असा विश्वास असल्यामुळे हे उत्तम होईल हे निर्विवाद आहे.

आगामी अंकात संमेलनाच्या तारखा देण्याचा मानस होता परंतु हॉलच्या तारखा अजून नक्की नसल्यामुळे कळवू शकत नाही. परंतु जानेवारी २०१९ मध्ये संमेलन होणार ह्यामध्ये संदेह नाही. संमेलन निवासी असेल, डॉर्मेटरी, जेवण, नाष्टा, चहा बरोबर व्यवस्था असेल. ऑक्टोबर २०१८ च्या अंकात आम्ही भिडे अंकात सविस्तर माहिती दिली जाईल. सांगलीला संमेलन म्हणजे गोवा, कर्नाटक, कोकण, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणांहून सांगलीला येण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. ह्या संमेलनामध्ये सक्रिय सहभागासाठी मिरज, विटा, तासगांव, सातारा इत्यादी भिडे मंडळींनी सुद्धा सहभागी होऊन सहकार्य करावे हे विनंतीपूर्वक सांगू इच्छितो. प्रत्येक संमेलनामध्ये तरुणांचा प्रतिसाद आणि कार्यक्रम ह्याबाबत नेहमीच उलटसुलट मतप्रदर्शन होत असते. त्या दृष्टीने संमेलनाची उभारणी किंवा संमेलन कसे साजरे केले म्हणजे उपस्थितीत वाढ होईल ह्याबाबत आपले मत प्रत्यक्ष संपर्क करून अथवा लेखी स्वरूपात कळवावी म्हणजे त्या दृष्टीने आपण सर्व मिळून, सर्वोत्कृष्ट कसे होईल ह्याबाबत त्याची आखणी करता येईल. आपला सहभाग व प्रतिसाद हीच भिडे प्रतिष्ठानची ताकद आहे.

– दिलीप भिडे, पुणे.
९६५७५४१२३६

सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सअॅप इ.) 'आम्ही भिडे'चा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर त्या ग्रुपला नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानची अधिकृत मान्यता नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.

'आम्ही भिडे' अंकासाठी आणि समस्त भिडे परिवाराकरिता हार्दिक शुभेच्छा !

सर्व सहली इतरांसोबत.... नर्मदा परिक्रमा मात्र गायत्री ट्रॅव्हल्स् सोबतच

# नर्मदा परिक्रमा

दि. १२ नोव्हेंबर २०१८ (१८ दिवस) रु. २४,२५०/– फक्त प्रत्येकी
(ज्येष्ठ नागरिकांसाठी) रेल्वे / बस प्रवास + निवास + भोजन व्यवस्थेसह.

निसर्गाच्या सानिध्यात उत्तुंग आनंदाचे क्षण घालवा...
प्रदुषण मुक्त देश अनुभवण्यासाठी एकदा चलाच!

# भूतान दर्शन

प्रस्थान : १९ ऑक्टोबर २०१८ (१३ दिवस) खर्च रु. ३३,५००/– (सर्व खर्चासह)
(रेल्वे प्रवास, निवास, शुद्ध शाकाहारी भोजन व्यवस्थेसह.)
(वरील यात्रा/सहलींचा प्रवास ३–ए.सी. क्लासने होणार)

वरील सहलींचे बुकींग सुरु झाले.. थोड्याच जागा !! भरपूर समाधान!

# गायत्री ट्रॅव्हल्स्

७७०, डेक्कन जिमखाना, भांडारकर रोड, पुणे ४
प्राची भिडे : ९८८१४२८१२१, ९६५७४५१४२६

दक्षिण काशी, वाईची चमचमीत चव सादर आहे

आता नवी चव
पोवई नाक्यावर



हॉटेल
मिलन
पुअर व्हेज

शुभारंभ १ ऑगस्ट २०१७ रोजी

आवर्जून खाल
आमची स्पेशल



निखारा मिसळ
निखारा मिसळ सोबत शुध्द तुपातील गूळ जिलेबी

हॉटेल मिलनच्या लोकप्रिय डिशेस
• बेगम बहार • नारालासा • नारियल पाणी

पंजाबी, चायनिज, जैन डिशेस

हॉटेल मिलन
विठ्ठल लिला कॉम्पलेक्स्,
पोवई नाका, सातारा
फोन : 94231 00004
94236 00050

'आम्ही भिडे' अंकासाठी आणि समस्त भिडे परिवाराकरिता हार्दिक शुभेच्छा !

**मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे**

ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८.
मो. ९८१९९ ५१३९१

**• पत्रव्यवहारासाठी पत्ता •**

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
**Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS**

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी'वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available


## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




**Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

**CASTINGS**



**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece - 2 Tonn**

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

**LADDLE**



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**